-: प्रेसनोट दिनांक- २३/०७/२०१९ :-

**अनिल महावीर नांद्रे , वय-४१, निम्नस्तर लिपीक, मानव संशोधन विभाग, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर वर्ग-३, रा. विकासनगर कॉलनी, एमएसईबी, इचलकरंजी ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेकडे ५००/- रुपये लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार श्री.सचिन आण्णासो कार्ले, रा.इंद्रनगर, कोरोची, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथे राहणेस आहेत. तक्रारदार खाजगी कॉन्ट्रक्टर असुन ते गर्व्हमेंट लायसन्स होल्डर यांच्याकडे काम करीत असतात. तक्रारदार यांचेकडे डायरेक्ट येणा-या ग्राहकांचे एमएसईबी कडील नवीन लाईट कनेक्शन मंजूर करून देणेचे काम असते. चार महिन्यापूर्वी रिलांयन्स मोबाईलचा नवीन टॉवर कोरोची ता.हातकणंगले या गावामध्ये उभा केला असुन त्याकरीता नवीन वीज कनेक्शनची आवश्यकता आहे. रिलांयन्स टॉवरचे काम करणारे मुख्य ठेकेदार यांनी तक्रारदार यांची भेट घेवुन रिलांयन्स टॉवरसाठी नवीन वीज कनेक्शन फर्म कोटेशनचे पत्र घेण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी रिलांयन्स मोबाईल टॉवरसाठी नवीन वीज कनेक्शन मंजुर होवुन त्याचे फर्म कोटेशनचे पत्र मिळणेकरीता सर्व कागदपत्रांची फाईल तयार करून एमएसईबी कार्यालय, इचलकरंजी येथील आवक जावक विभागाचे क्लार्क अनिल नांद्रे यांचेकडे दिली.

दि.२२/०७/२०१९ रोजी तक्रारदार यांनी एमएसईबी कार्यालय, इचलकरंजी येथील आवक जावकचे क्लार्क अनिल नांद्रे यांची समक्ष जावून भेट घेतील असता त्यांनी रिलांयन्स टॉवरसाठी नवीन वीज कनेक्शन फर्म कोटेशनचे पत्र देणेकरीता ५००/- रुपये द्यावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २२/०७/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे एमएसईबी कार्यालय, इचलकरंजी येथील आवक जावकचे क्लार्क अनिल नांद्रे यांच्या विरुध्द तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दिनांक २३/०७/२०१९ रोजी एमएसईबी कार्यालय, इचलकरंजी येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणीमध्ये एमएसईबी कार्यालय, इचलकरंजी येथील आवक जावकचे क्लार्क अनिल नांद्रे यांनी तक्रारदार यांच्याकडे रिलांयन्स टॉवरसाठी नवीन वीज कनेक्शन फर्म कोटेशनचे पत्र देणेकरीता ५००/- रुपये लाचेची रक्कम मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले. त्याप्रमाणे लागलीच एमएसईबी कार्यालय, इचलकरंजी या ठिकाणी क्लार्क अनिल नांद्रे यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन केले असता, क्लार्क अनिल नांद्रे यांनी पंच साक्षीदार यांचे समक्ष ५००/- रुपये लाचेची रक्कम मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रीया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. दिलीप बोरस्ते, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, श्री.जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार, शामसुंदर बुचडे, पो.ना. शरद पोरे, नवनाथ कदम, पोलीस कॉन्स्टेबल, कृष्णात पाटील, तसेच चालक पोहेकॉ. सुरज अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३)श्री.आदिनाथ बुधवंत , पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ७०८३६६८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**